Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक १३] गुरुवार ते बुधवार, एप्रिल १५-२१, २०२१/चैत्र २५-वैशाख १, शके १९४३ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५८.

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ३० मार्च, २०२१.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.—**

क्रमांक टिपीएस-२६१९-२७८४-प्र.क्र.५१-नवि-९-२०२०.—

ज्याअर्थी, वर्धा शहराची (सुधारीत) विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे.) चे कलम ३१(१) अन्वये शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीएस-२६०१-१३८०-प्र.क्र.६०(डी)-२००२-नवि-९, दि. ०९ जानेवारी २००४ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक २५ फेब्रुवारी २००४ पासून अंमलात आलेली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, मौजा वर्धा येथील नझूल शिट क्रमांक १९ भूखंड क्रमांक १४ व ११/१अ मधील क्षेत्र १२७४५.० चौ.मी. ही जागा (यापुढे "उक्त जागा" असे संबोधले आहे.) आरक्षण क्रमांक ३३ " व्हेज मार्केट व शॉपिंग सेंटर " या आरक्षणामध्ये समाविष्ट आहे (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, वर्धा नगर परिषद, वर्धा यांनी नियोजन प्राधिकरण (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधले आहे.) म्हणून, त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १७, दिनांक १६ फेब्रुवारी २०१९ नुसार उक्त आरक्षणाचे समुचित प्राधिकरण नगर परिषद वर्धा ऐवजी कृषी उत्पन्न बाजार समिती, वर्धा करण्याचे ठरवून त्याअनुषंगाने, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप-कलम (१) मध्ये नमूद वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदल प्रस्ताव मंजुरीसाठी शासनास सादर केलेला आहे (यापुढे "प्रस्तावित फेरबदल" असे संबोधले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशीनंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त फेरबदल मान्य करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप-कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलास शासन पुढीलप्रमाणे मान्यता देत आहे आणि त्यासाठी उपरोल्लिखित दिनांक ९ जानेवारी, २००४ ची विकास योजना मंजुरीची अधिसूचना सुधारीत करण्यात येत आहे.

"उक्त विकास योजना मंजुरीच्या दिनांक ९ जानेवारी, २००४ च्या अधिसूचनेच्या फेरबदल सूचितील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे " —

**नोंद**

मौजा वर्धा येथील नझूल शिट क्रमांक १९ भूखंड क्रमांक १४ व ११/१अ क्षेत्र १२७४५.० चौ.मी. क्षेत्रावरील जागा नकाशात दर्शविल्यानुसार आरक्षण क्रमांक ३३ " व्हेज मार्केट व शॉपिंग सेंटर " या आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण नगर परिषद वर्धा ऐवजी " कृषी उत्पन्न बाजार समिती, वर्धा" करण्यात येत आहे.

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारी प्रस्तुत अधिसूचना / भाग नकाशा, मुख्याधिकारी, वर्धा नगर परिषद, वर्धा, जिल्हा वर्धा यांचे कार्यालयात, नागरीकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात येत आहे .

सदर अधिसूचना शासनाच्या **www.maharashtra.gov. in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**प्रणव कर्पे,**
कार्यासन अधिकारी.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५९.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai-400 032, Dated the 30th March, 2021.

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.—

No. TPS-2619-2784-C.R.-51-UD-9-2020.—

Whereas, Development Plan of Wardha (Revised) City has been sanctioned by the Government *vide* Urban Development Department's Notification No. TPS-2601-1380-C.R.-60(D)-2002-UD-9, dated 09th January 2004 and has come into force with effect from 25th February 2004 (hereinafter referred to as "the said Development Plan") under Section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") ;

And whereas, in the said Development Plan, land bearing Nazul Sheet Nos. 19, Plot No. 14 & 11/1A area admeasuring about 12745.0 Sq. Mt. of Mouja Wardha (hereinafter referred to as "the said Land") are reserved for Site No. 33 "Vegebale Market & Shopping center" (hereinafter referred to as "the said Reservation");

And whereas, the Wardha Municipal Council, Wardha being the Planning Authority (hereinafter referred to as "the said Planning Authority"), *vide* its General Body Resolution No. 17, dated 16th February 2019 has resolved to appoint appropriate authority as Agricultural Produce Market Committee instead of Wardha Municipal Council for the said reservation. Accordingly after following all the legal procedure as per the provisions of sub-section (*1*) of Section 37 of the said Act submitted a modification proposal to the Government for its sanction (hereinafter referred to as "the said Proposed Modification") ;

And whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune the Government is of opinion that the said proposed Modification should be sanction.

Now, therefore, in exercise of the powers conferred on it under sub-section (*2*) of Section 37 of the said Act, the Government hereby, sanctions the said Proposed Modification and for that purpose amends the aforesaid Notification dated the 09-01-2004 as follows.—

"In the Schedule of Modifications appended to the Notification dated 9th January 2004 sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry "–

*ENTRY*

"The land bearing Nazul Sheet Nos. 19, Plot No. 14 & 11/1A area admeasuring 12745.0 Sq. Mt. are reserved for Site No. 33 "Vegetable mrket & Shopping Center". The Appropriate Authority for this reservation shall be Agricultural Produce Market Committee instead of Wardha Municipal Council as shown on plan."

A copy of the said Notification, along with the part plan showing the aforesaid sactioned modification, shall be available for inspection of the general public, in the Office of the Chief Offcer, Wardha Municipal Council, Wardha during office hours on all working days for a period of on month.

This Notification shall also be available on the Government web site *www.maharashtra.gov. in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRANAV KARPE,
Section Officer.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६०.

**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांजकडून**

क्रमांक जिपव-ग्रापं.-अनुदान-वशि-१७१-२०२१.—

सेवाग्राम विकास योजनेच्या क्षेत्रातील मौजा सेवाग्राम ग्रामपंचायत सेवाग्राम, ता. जि. वर्धा येथील श्री. संजय पुंडलीकराव मानमोडे व इतर दोन, रा. सेवाग्राम, ता. जि. वर्धा यांचे मालकीचे शेत सर्वे क्र. ८७/१ व ८७/२ एकूण आराजी ५.५४ हे.आर कृषि क्षेत्रामध्ये समाविष्ट जमिनीचे मधून काढून रहिवासी झोन मध्ये बदल करणेबाबत.

ग्रामपंचायत सेवाग्राम मधील जिल्हा परिषद, वर्धा कक्षेतील शेत सर्वे क्रमांक ८७/१ व ८७/२ मध्ये विषयांकित बदल करण्याकरीता चा प्रस्ताव शासनाकडे सादर करावयाचा असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक १४ जून, १९९० चे क्रमांक वियो-सेवाग्राम-(बिनप)-टिपीव्ही-६-७६९१- नुसार वर्धा जिल्हा परिषद ने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांची अधिसूचना क्रमांक डिपी-सेवाग्राम-अडमिन-२, दिनांक १८ मे, १९७७ द्वारा सेवाग्राम, नांदोरा, कामठवाडा, वरुड आणि बरबडी ह्या ५ ग्रामपंचायतीच्या संपूर्ण क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार वापरण्याची परवानगी दिल्यामुळे महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग निर्णय क्रमांक टीपीव्ही १०८६-३७९१-सीआर-१०३-१-८७ नवि-१७, दिनांक ५ जानेवारी, १९८७ अन्वये ' ब ' व ' क ' वर्ग नगर परिषद तसेच बिगर नगर परिषद

शहरांच्या विकास योजनांना उक्त अधिनियमाच्या कलम ३१ नुसार अंतिम मंजुरी देण्याबाबतचे अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे द्वारे दिनांक ३१ मार्च, १९९० या दिनांकापासून विकास योजना अंमलात आली. करीता सेवाग्राम विकास योजनेनुसार मौजा सेवाग्राम गावाचा विकास करण्याचे दृष्टीने वरील मंजूर विकास योजनमध्ये खालीलप्रमाणे किरकोळ फेरबदल करणे आवश्यक आहे.

मंजूर विकास योजनेतील मंजूर अभिन्यास मौजा-सेवाग्राम ग्रामपंचायत सेवाग्राम, ता. जि. वर्धा येथील श्री.संजय पुंडलीकराव मानमोडे, श्री. गणेश परशुरामजी अतकर, श्री. मोहन पुंडलिकराव मानमोडे, रा. सेवाग्राम, तालुका, जिल्हा वर्धा यांचे मालकीचे शेत सर्वे क्रमांक ८७/१ आराजी २.८३ हे. आर व सर्वे क्रमांक ८७/२ आराजी २.७१ हे. आर एकूण आराजी ५.५४ हे. आर क्षेत्र आहे. त्यांनी सदरचे क्षेत्राचा वापर निवासी प्रयोजना करीता करण्याचे ठरविले आहे. त्या करीता त्यांनी जिल्हा परिषदेकडे दिनांक ४-०१-२०२१ ला कागदपत्रांचे पूर्ततेसह प्रस्ताव सादर करून क्षेत्र बदल करण्याची विनंती केलेली आहे. सोबत १. ग्रामपंचायत सेवाग्राम यांचे ठराव क्रमांक दिनांक २७-११-२०२० चे सभेचे ठराव अन्वये सदरचे क्षेत्र बदल करण्यास मंजुरी दिलेली आहे. २. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचे पत्र क्रमांक DHO/UIP/Site Insp./19-1579, Date 29-09-2020 अन्वये शेत सर्वे क्र. ८७/१ व ८७/२ एकूण आराजी ५.५४ हे.आर क्षेत्र हे रहीवासी करण्यास मंजुरी दिलेली आहे. तसेच जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा विषय क्रमांक ४, ठराव क्रमांक ४, दिनांक २४-०३-२०२१ अन्वये उक्त कृषी क्षेत्रात समाविष्ट जमिनीचे रहीवासी क्षेत्रात बदल करण्यास मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर प्रस्तावाबाबत सूचित करण्यात येते की, ज्या कुणाला वरील फेरबदलाबाबत काही आक्षेप अथवा सूचना पाठवावयाच्या असतील त्यांनी ही सूचना वृत्तपत्रात तसेच महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावेत. विहित मुदतीत आक्षेप प्राप्त झाल्यास त्यांचा विचार करण्यात येईल. सदहू किरकोळ फेरबदल दर्शविणारा सेवाग्राम विकास योजनेचा नकाशा कार्यालयील वेळात सर्व दिवशी अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला आहे.

**डॉ. सचिन ओम्बासे,** (भा. प्र. से),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, वर्धा.

वर्धा :
दिनांक ३१ मार्च २०२१.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६१.

## मुख्याधिकारी, नगर पंचायत, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ (१) [कलम २१ (२) सह] नुसार कोरपना नगर पंचायत क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

क्रमांक न.पं.-बांध-८५०-२०२१.—

शासने नगर विकास विभागाकडील, शासन निर्णय क्रमांक एमयूएन-२०१४-प्र.क्र. १०२/१८/नवि-१८, दिनांक २३-०४-२०१५ अन्वये कोरपना नगर पंचायत स्थापना केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) अन्वये कोरपना नगर पंचायत क्षेत्रात नियोजनबद्ध विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, चे कलम २३ (१) [कलम २१ (२) सह] अन्वये कोरपना नगर पंचायतीने विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी विशेष सभेचा ठराव क्रमांक १, दिनांक २४-०३-२०२१ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ (२) नुसार कोरपना नगर पंचायत योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा कोरपना नगर पंचायतीच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांना याबाबत काही सूचना / हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत मुख्याधिकारी, कोरपना नगर पंचायत यांचेकडे लेखी स्वरुपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना त्या सूचना/ हरकतीचा योग्य तो विचार करण्यात येईल.

**सुर्यकांत बंडू पिदुरकर,**
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, कोरपना.

कोरपना :
दिनांक ३० मार्च २०२१.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६२.

BY CHIEF OFFICER, NAGAR PANCHAYAT

**Declaration of intention to prepare Development Plan of Korpana Nagar Panchayat u/s 23 (*1*) [read with section 21 *(2)*] of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.—**

No. NP-Const.-850-2021.—

Government of Maharashtra in Urban Development Department *vide* its Notification No. MUN-2014/ C.R. 102/D-18, dated 23rd April 2015 constituted Korpana Nagar Panchayat. It is necessary to prepare the Development Plan for the area of Nagar Panchayat as per Section 21 *(2)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for Planned Development of the said area.

Hence, the Korpana Nagar Panchayat by its Resolution No. 01, Dated 24-03-2021 has given consent to declare its intention to prepare Development Plan, as per provision of Section 23 *(1)* [read with Section 21 (2)] of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development Plan of Korpana Nagar Panchayat is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of the Korpana Nagar Panchayat, as required under Section 23 *(2)* of the Maharashtra Regional & Town Palnning Act, 1966.

Any suggestion / objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Korpana, Nagar Panchayat within a period of 60 (sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette.* The suggestion / objection shall be duly considered while preparing the Development Plan.

SURYAKANT BANDU PIDURKAR,
Chief Officer,
Nagar Panchayat, Korpana.

Korpana :
Dated the 30$^{th}$ March 2021.

ना.-एक-अ-२ (१५१०).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.